classmate
Date
Page

# २. राष्ट्रीय उत्पन्न

## * प्रस्तावना :-

राष्ट्रीय उत्पन्न हे देशांच्या अर्थव्यवस्थेचा आरसा म्हणून ओळखले जाते. देशांच्या आर्थिक व्यवहारांत राष्ट्रीय उत्पन्नांला विशेष महत्त्व आहे राष्ट्रीय उत्पन्नांमुळे देशांच्या आर्थिक विकासांच्या वेग समजतो. शेती क्षेत्र, व्यापार क्षेत्र व सेवा क्षेत्र यांचा देशांच्या आर्थिक विकासांत वाटा किती आहे? हे राष्ट्रीय उत्पन्नांमुळे समजते त्याचप्रमाणे देशांतील अनेक समस्या सोडविण्यांचे तंत्र राष्ट्रीय उत्पन्नांत असल्याने या संकल्पनेबरोबरच इतर संकल्पनेचा आढावा घेऊ.

## * राष्ट्रीय उत्पन्नांची व्याख्या :-

① अर्थतज्ञ पिटरसन यांच्यामते :-

"एका विशीष्ट कालखंडात देशांतील अर्थव्यवस्थेत उत्पादीत होणाऱ्या सर्व अंतीम वस्तु व सेवांचे बाजारीकिंमतीनुसार केलेले मोजमाप म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

② राष्ट्रीय उत्पन्न सामिती यांच्यामते :-

"राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखादया विशिष्ट कालखंडात निर्माण झालेल्या वस्तु व सेवांचे दुहेरी मोजमाप होऊ न देता केलेले मापन होय."

याप्रकारांच्या व्याख्या राष्ट्रीय उत्पन्नांच्या केल्या जातात.

## * राष्ट्रीय उत्पन्नांची वैशिष्ट्ये :-

1) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यासाठी एक वर्षाच्या कालखंड विचारांत घेतला जातो (1 एप्रिल ते 31 मार्च)
2) देशांतील फक्त अंतीम वस्तु व सेवांची बाजारांतील किंमत मोजली जाते.
3) वस्तु व सेवांचे दुहेरी मोजमाप होणार नाही यांची काळजी घेतली जाते.

4) राष्ट्रीय उत्पन्नांत फक्त देशांतील नागरीकांनी देशांत व विदेशात उत्पादीत केलेल्या वस्तु व सेवांच्या विचार केला जातो.
5) राष्ट्रीय उत्पन्नांस स्थुल राष्ट्रीय उत्पन्न असे ही म्हणतात.
6) राष्ट्रीय उत्पन्नांमुळे देशांतील प्रगतीचा आढावा समजतो.
7) राष्ट्रीय उत्पन्नांत भांडवली वस्तुची झीज अथवा घसारा अथवा भांडवलक्षय भत्ता समाविष्ट असतो.
8) हस्तांतरीत उत्पन्नांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नांत केला जात नाही.
9) बेकायदेशीरमार्गाने मिळविलेले उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नांत मोजले जात नाही.
10) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांतून घसारा खर्च वजा केला असता देशांचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न मिळते.

या प्रकारची वैशिष्ट्ये राष्ट्रीय उत्पन्नांची होय.

* राष्ट्रीय उत्पन्नांच्या विविध / वेगवेगळ्या संकल्पना :-

① स्थुल राष्ट्रीय उत्पादन / उत्पन्न :- (Gross National Product - GNP)

स्थुल राष्ट्रीय उत्पन्नालाच एकूण राष्ट्रीय उत्पन्न अथवा उत्पादन असेही म्हणतात या संकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :-

"विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत देशांतील नागरीकांनी देशांत व विदेशात उत्पादीत केलेल्या सर्व अंतीम वस्तु व सेवांचे बाजारभावाने केलेले मुल्य मोजणे म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादन होय."

या प्रकारे स्थुल राष्ट्रीय उत्पादनांची व्याख्या केली जाते. स्थुल राष्ट्रीय उत्पादन काढण्यासाठी पुढील सुत्रांचा वापर केला जातो.

Formula :- $GNP = GDP + (X - M) + (R - P)$

OR

$$GNP = C+I+G+(x-M)$$

* सुत्रांचा अर्थ :-

GNP → म्हणजे Gross N tional Product.
GDP → म्हणजे Gross Domestic Product
EX → एक्सपोर्ट (Export)
Im → इम्पोर्ट (Import)
R → रिटर्नस (भारतीयांच्या विदेशातील गुंतवणूकीतून (Returns) मिळणारे उत्पन्न)
P → Paid (विदेशी लोकांना द्यावे लागणारे उत्पन्न)

या सुत्रांच्या साहय्याने स्थूल राष्ट्रीय उत्पादन काढले जाते.

* स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करताना महत्त्वांच्या बाबी:

1) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यांसाठी 1 वर्षीचा काळ विचारात घेतला जातो.
2) देशांतील फक्त अंतिम वस्तु व सेवांची बाजारांतील किंमत विचारात घेतली जाते.
3) उत्पादन प्रक्रियेतील मध्यल्या वस्तु वगळल्या जातात.
4) वस्तुचे दुहेरी मापन टाळले जाते.
5) विनामुल्य पुरविल्या जाणाऱ्या वस्तु व सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही
6) राष्ट्रीय उत्पन्नात फक्त देशांतील नागरीकांनी देशात व विदेशांत उत्पादीत केलेल्या वस्तु व सेवांचाच विचार केला जातो.
7) राष्ट्रीय उत्पादनांस स्थुल राष्ट्रीय उत्पन्न/उत्पादन असेही म्हणतात.
8) राष्ट्रीय उत्पादनांत भांडवली वस्तुची झिज समाविष्ट असते.
9) राष्ट्रीय उत्पादनांतून देशांतील प्रगतीचा आढावा समजतो. हस्तांतरीत उत्पादनांच्या समावेश स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

10) बेकायदेशीर मार्गाने मिळविलेले उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जात नाही.

या प्रकारच्या महत्त्वांच्या बाबी स्थूल राष्ट्रीय उत्पादन मोजताना विचारात घ्याव्या लागतात.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनांचे मापन करण्यासाठी वेगवेगळ्या अर्थतज्ञांनी तीन दृष्टीकोन सुचविले आहे ते म्हणजे :-

अ) स्थूल राष्ट्रीय उत्पादन मापनांच्या उत्पन्न दृष्टीकोन :-

उत्पन्न दृष्टीकोनांनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करताना पुढीलबाबी विचारात घ्याव्या असे काही तज्ञांचे मत होते, ते म्हणजे :- खंड वेतन व्याज नफा कंपन्यांनी न वाटलेला नफा, घसारा खर्च, संमिश्र उत्पन्न व सकारात्मक विदेशी उत्पन्न इ.

ब) खर्च दृष्टीकोनांनुसार मोजमाप :-

खर्च दृष्टीकोनांनुसार मोजमापांत पुढील खर्चाचा समावेश होतो :- खाजगी उपभोग खर्च + खाजगी गुंतवणूक खर्च + निव्वळ विदेशी गुंतवणूक + सरकारच्या वस्तु व सेवांवरील खर्च.

क) मुल्यवाढ दृष्टीकोनांनुसार मोजमाप :-

राष्ट्रीय उत्पादनांचे दुहेरी मोजमाप टाळण्यासाठी मुल्यवाढ किंवा अंतिम उत्पादन पद्धत वापरली जाते. मुल्यवाढ म्हणजे - "उत्पादनांच्या विविध प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या आदानांचे मुल्य आणि उत्पादीत झालेल्या अंतिम वस्तुंच्या उत्पादनांचे मुल्य यांतील फरक म्हणजे मुल्यवाढ होय".

उद्योग संस्था वस्तुंच्या उत्पादनांसाठी कच्चा माल इंधन यांचा वापर करते, त्यामुळे उत्पादनांच्या प्रत्येक टप्प्यांत भर पडते. अशा मुल्यांची बेरीज करून मुल्यवाढ काढता येते. उदा. एखाद्या उद्योग संस्थेचे अंतिम उत्पादन मुल्य 100 कोटी रूपये आहे. तर उत्पादन करताना संस्थेने वापरलेल्या

आदानांच्या खर्च 75 कोटी रुपये आहे तर मुल्यवाद 100 - 75 कोटी = 25 कोटी रु असेल

या प्रकारे स्थूल राष्ट्रीय उत्पादनांची संकल्पना स्पष्ट करता येते.

② * निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न :- / उत्पादन (NNP)

स्थूल राष्ट्रीय उत्पादनांतून भांडवली वस्तुंची झिज वजा केल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते. त्यांस निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न / उत्पादन किंवा वट्ट राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात" यांप्रकारे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनांची व्याख्या केली जाते. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न हे देशांच्या प्रगतीचे खरे चित्र स्पष्ट करते. राष्ट्रीय उत्पन्नांतील ही संकल्पना महत्त्वाची आहे. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न काढण्यासाठी पुढील सुत्रांचा वापर केला जातो.

निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न = स्थूल राष्ट्रीय उत्पादन - घसारा खर्च.

N.N.P = GNP - C.C.A.

या सुत्रांने निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. अर्थात निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन दोन प्रकारे केले जाते.

① चालू किंमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न :-

चालू किंमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नांलाच बाजारी किंमती नुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. यांची व्याख्या पुढील प्रमाणे केली जाते.

" जेव्हा चालू किंमतीनुसार आलेल्या स्थुल राष्ट्रीय उत्पादनांतून घसारा खर्च वजा केल्यानंतर जे उत्पन्न मिळते त्यांस चालू किंमतीनुसार निव्वळ रा. उत्पन्न असे म्हणतात."

चालू किंमतीनुसार नि. रा. उ. काढण्यासाठी

पुढील सूत्रांचा वापर केला जातो.

सूत्र :-

चालू किंमतीनुसार नि. रा. उ. = चालू किं. स्थूल राष्ट्रीय उत्पन्न - घसारा खर्च

② घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न :-

"उत्पादक घटकांना म्हणजेच भूमी, श्रम भांडवल व संयोजक यांना 1 वर्षाच्या काळात त्यांच्या कार्याबद्दल व सेवेबद्दल जे उत्पन्न प्राप्त होते. त्यांची बेरीज करून त्यांतून घसारा खर्च वजा केल्यास येणाऱ्या उत्पन्नास घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात."

घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न काढण्यासाठी पुढील सूत्रांचा वापर केला जातो.

सूत्र :-

घटक खर्चानुसार नि. रा. उ. = घटक खर्चानुसार स्थु. रा. उ. - घसारा खर्च.

या सूत्रांचा वापर करून घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. सर्वसाधारणपणे घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादनापेक्षा चालू किंमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन अधिक असते. कारण शासनाने दिलेल्या अनुदानापेक्षा शासनाला मिळणारा कर अधिक असतो. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न हे देशांचे खरे उत्पन्न असते. त्यातून देशांच्या प्रगतीचा खरा चेहरा दिसतो.

③ घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न :-

"कोणत्याही वस्तु व सेवांचे उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या चार उत्पादक घटकांची आवश्यकता असते. या चार घटकांना त्यांच्या कार्याबद्दल अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा या स्वरूपात मोबदला दिला जातो. या सर्व मोबदल्यांची बेरीज करून आलेल्या उत्पन्नास घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात."

घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न पुढील सुत्राने काढले जाते.

घटक खर्चानुसार स्थु. रा. उ. = खंड + वेतन + व्याज + नफा.

OR

घटक खर्चानुसार स्थु. रा. उ. = चालू किं. स्थु. रा. उ. - अप्रत्यक्ष कर + अनुदाने

यांपैकी कोणत्याही एका सुत्रांचा वापर करून घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन काढले जाते. घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन काढायचे असेल तर यांतून घसारा खर्च वजा करावा लागतो. त्यासाठी पुढील सुत्र वापरले जाते.

घटक खर्चानुसा नि. रा. उ. = घ. खर्चानुसार स्थु. रा. उ. - घसारा खर्च

यांप्रकारे ही संकल्पना स्पष्ट करता येते.

(4) वैयक्तीक उत्पन्न

"व्यक्तीगत उत्पन्न म्हणजेच आर्थिक वर्षात व्यक्ती व कुटुंबाला सर्व मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नांची बेरीज होय" या प्रकारे व्यक्तीगत उत्पन्नांची व्याख्या केली जाते. व्यक्तीगत उत्पन्नांत खंड, वेतन, व्याज व नफा तसेच घरभाडे, देवस्थान, क्लब, शेती उत्पन्न या सर्वांचा समावेश होतो. व्यक्तीगत उत्पन्नात समाविष्ट होणारे काही उत्पन्न हे राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जात नाही. म्हणून व्यक्तीगत उत्पन्न कधीच राष्ट्रीय उत्पन्नांत मोजले जात नाही त्यामुळे व्यक्तीगत उत्पन्न कधीच राष्ट्रीय उत्पन्नां ऐवढे नसते.

⑤ * उपलब्ध उत्पन्न / खर्च शक्य उत्पन्न / व्ययशक्य उत्पन्न :-

व्ययशक्य उत्पन्नांलान्य खर्च करता येण्याजोगे उत्पन्न असे म्हणतात. व्यक्तीला जे उत्पन्न मिळते ते सर्वच खर्च करता येत नाही. कारण मिळणाऱ्या उत्पन्नांतून प्रत्यक्ष करांच्या स्वरूपात काही उत्पन्न सरकारला द्यावे लागते. म्हणून खर्च करण्याजोग्या उत्पन्नांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते.

"व्यक्तीला मिळालेल्या वैयक्तीक उत्पन्नांतून प्रत्यक्ष कर, विमा हप्ता, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी यासारखे देणी वजा जाता जे शिल्लक राहते त्यांस खर्च शक्य उत्पन्न असे म्हणतात."

खर्च शक्य उत्पन्न पुढील सूत्राने काढले जाते.

खर्चशक्य उ. = वैयक्तीक उ. - प्रत्यक्ष कर व इतर देणी.

अशा प्रकारे ही संकल्पना स्पष्ट करता येते.

* राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या / मापनांच्या पद्धती :-

राष्ट्रीय उत्पन्नांच्या विविध व्याख्येवरून राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करण्याच्या तीन पद्धती अस्तित्वात आहे त्या पुढील प्रमाणे.

① उत्पादन पद्धती :-

राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करण्यासाठी उत्पादन पद्धती वापरली जाते. या पद्धतीला निव्वळ प्रदान पद्धत असे ही म्हणतात. या पद्धतीनुसार 1 वर्षाच्या कालावधीत देशांत उत्पादीत झालेल्या सर्व अंतिम वस्तु आणि सेवांचे बाजार भावाने होणारे मुल्य मोजले जाते.

अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांतून आलेल्या उत्पादनांचे बाजारभावाने मोजमाप केले जाते. व आलेल्या उत्पन्नांतून भांडवली वस्तुंची होणारी झिज किंवा घसारा खर्च वजा करून निव्वळ राष्ट्रीय उत्पादन काढले जाते. उत्पादन पद्धतीनुसार एकच

उत्पादन दोन वेळा मोजले जाऊ नये यासाठी अंतिम उत्पादन विचारात घेतले जाते. या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न मोजल्यास कोणत्या क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पन्नांत किती वाटा आहे हे समजते.

② उत्पन्न पद्धती :-

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची ही दुसरी पद्धत होय. उत्पादक घटकांना (भूमी, श्रम, भांडवल व संयोजक) मिळणाऱ्या मोबदल्यांची (अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा) बेरीज करून जेव्हा राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन केले जाते. तेव्हा त्यास घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. हीच ती उत्पन्न पद्धत होय.

उत्पन्न पद्धतीनुसार वस्तु व सेवांचे दुहेरी मोजमाप होणार नाही यांची दक्षता घेतली जाते. हस्तांतरीत उत्पन्नांचा (बेकार भत्ता, निवृत्ती वेतन व इतर राष्ट्रीय मदत इ) समावेश केला जात नाही.

③ खर्च पद्धत :-

देशांचे एकूण उत्पन्न हे एकूण खर्चा एवढे असते त्यामुळे खर्च पद्धतीनुसार एका वर्षाच्या कालावधीत खाजगी व्यक्तींच्या उपभोग खर्च, खाजगी संस्थांच्या गुंतवणूक खर्च तसेच शासनांच्या वस्तु व सेवेवरील खर्च तसेच निव्वळ विदेशी खर्च या सर्वांचा समावेश केला जातो व त्यातून घसारा खर्च वजा करून देशांचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न खर्च पद्धतीने काढले जाते.

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची ही अचूक व योग्य पद्धत आहे. पण लोकांच्या वैयक्तीक उपभोग खर्च मोजणे कठिण असल्याने ही पद्धत गुंतागुंतीची आहे.

वरील प्रकारच्या तीनही पद्धती जागतिक पातळीवर सर्व मान्य पद्धती आहे. या तीन पैकी कोणत्याही एका पद्धतीचा वापर करता येतो. भारतात शेती क्षेत्रांसाठी उत्पादन पद्धत तर औद्योगीक क्षेत्र व सेवा क्षेत्रांसाठी उत्पन्न पद्धती वापर-

ली जाते.

2012 8M 2013 Act

## * राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील अडचणी :-

राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करताना अनेक प्रकारच्या अडचणी येतात. या अडचणींचे वर्गीकरण प्रामुख्याने 2 प्रकारात केले जाते ते पुढीलप्रमाणे.

अ) संकल्पनात्मक / तात्वीक अडचण
ब) सांख्यीकिय / व्यावहारीक अडचण

या अडचणींचा आढावा पुढील प्रमाणे.

### अ) संकल्पनात्मक / तात्वीक अडचण :-

राष्ट्रीय उत्पन्नांची संकल्पना स्पष्ट न झाल्याने ज्या अडचणी निर्माण होतात त्या संकल्पनात्मक अडचणी होत. अशा अडचणी पुढीलप्रमाणे.

① राष्ट्रीय उत्पन्नांची व्याख्या :-

राष्ट्रीय उत्पन्नांची संकल्पना स्पष्ट करताना अनेक अर्थतज्ञांचे एक मत नाही. कोणी एका वर्षात उत्पादीत झालेल्या वस्तु व सेवांचे राष्ट्रीय उत्पन्नांत मोजमाप करावे असे सांगतात, तर कोणी ज्या वस्तु व सेवा पैशांच्या साहय्याने खरेदी विक्री होतात अशांचा समावेश करावा असे सांगतात. तर फिशर सारखा अर्थतज्ञ म्हणतो :- " प्रत्यक्ष उपभोगांसाठी ज्या वस्तु व सेवा घेतात त्यांचाच समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा".

थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्नांच्या व्याख्येत एकवाक्यता नसल्याने अडचण येते.

② राष्ट्रीय उत्पन्न मापनांच्या पद्धती :-

राष्ट्रीय उत्पन्नांचे मापन करण्यासाठी उत्पादन, उत्पन्न पद्धत व खर्च पद्धत. यापैकी कोणत्या पद्धतीची निवड करावी हे ठरविणे अवघड ठरते.

③ उत्पादनाचे स्वरूप :-

उत्पादन प्रक्रिया ही सतत चालु रहणारी असल्याने व वस्तु उत्पादनाचे स्वरूप साठ्यासारखे नसते तर ते प्रवाहासारखे असते. उत्पादन सतत होत असल्याने प्रवाहाचे स्वरूप असणा-या वस्तु व सेवांचे मापन करणे कठीण असते.

④ कोणत्या वस्तु व सेवांचा समावेश करावा :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना ज्या वस्तु व सेवांचा मोबदला पैशात दिला जातो. अशांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश होतो. पण काही वस्तु ह्या अशा असतात की त्यांचा समावेश कसा करावा हा प्रश्न पडतो. उदा. डॉ. ने स्वतः च्या कुटुंबास पुरविलेली सेवा, पेंटरने स्वतः चे घर रंगविणे वकीलाने स्वतः चा खटला स्वतः चालविला. इ अशावेळी अशा वस्तु व सेवांचा समावेश करताना अडचण येते.

⑤ वास्तव उत्पन्नाचे मापन करण्याची अडचण :-

किंमतील चढ उतारांचा परिणाम नाहिसा केल्याशिवाय वास्तव उत्पन्नातील बदल कळत नाही. यासाठी एखादे वर्ष मुळ वर्ष म्हणून गृहित धरावे लागते असे वर्ष सर्व-साधारण वर्ष असावे ते फार दुरचे असता कामा नये नंतर त्या वर्षाच्या प्रत्येक वस्तुच्या उत्पादनाला मुळ वर्षाच्या किंमतीने गुणून वास्तव उत्पन्न काढावे लागते. पण आज बाजारात ज्या अनेक वस्तु विकत मिळतात व त्या पुर्वी अस्तित्वातच नव्हत्या अशावेळी त्यांच्या किंमती कशा काढणार?

उदा. आजच्या संगणक मोबाईल इ.

⑥ बेकायदेशीर उत्पन्नाचे मापन :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणा-या अवैध मार्गाने मिळणा-या उत्पन्नाचे मापन केले जात नाही. परंतु काळाबाजार, चोरटा व्यापार, तस्करी, जुगार, अम्मली पदार्थाची खरेदी-विक्री इ बेकायदेशीर मार्गाने लोकांना फार मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. परंतु अशा उत्पन्नास सरकारी मान्यता नसल्याने राष्ट्रीय उत्पन्नात त्याचा समावेश केला जात नाही. त्यामुळे देशाचे खरे उत्पन्न समजत नाही.

(7) सरकारी सेवा :-
शासन उत्पादक व उपभोक्ते यांना विविध प्रकारच्या सेवा पुरविते. काही सेवांच्या मोबदला शासनाला पैशात मिळतो. तर काही सेवा शासनाकडून मोफत पुरविल्या जातात. अशा मोफत पुरविल्या जाणाऱ्या सेवांच्या लाभ ग्राहकाला किती झाला व उत्पादकाला किती झाला हे सांगणे कठीण असल्याने या सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश करताना अडचण येते.

(8) हस्तांतरीत उत्पन्नाचे मापन :-
राष्ट्रीय उत्पन्न मोजताना हस्तांतरीत उत्पन्नाच्या समावेश केला जात नाही. उदा. निवृत्ती वेतन, बेकार भत्ता, राष्ट्रीय मदत इ. परंतु शासनाच्या यावर खर्च होतच असतो पण हे उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट केले जात नसल्याने अडचण येते.

(9) किंमतीतील बदल :-
किंमतीत होणाऱ्या बदलामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अडचणी येतात. जर देशातील वस्तु व सेवांच्या किंमती वाढल्या तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ दिसून येते. याउलट किंमती कमी झाल्यास राष्ट्रीय उत्पन्न कमी होते. म्हणजेच उत्पादनात वाढ न होता वस्तूच्या किंमती वाढतात. याउलट उत्पादन वाढूनही किंमती कमी होतात. अशावेळी किंमतीतील उत्पादनात चढ उतारामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे खरे मापन करणे कठीण जाते.

(10) स्थूलानियता :-
राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट होणाऱ्या वस्तु व सेवा सर्वच देशात सारख्याच नसतात. प्रत्येक देशानुसार त्यांच्या भौगोलिक रचनेनुसार लोकांच्या गरजा ही भिन्न असतात. अशावेळी भिन्न देशातील उत्पन्नाची तुलना करणे कठीण असते.

या प्रकारच्या संकल्पनात्मक अडचणी होत.

## ब) सांख्यिकीय किंवा व्यावहारिक अडचणी :

### 1) उत्पादनाचे दुहेरी मापन :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना एकच उत्पादन २ वेळा मोजले जाणार नाही यासाठी अंतिम उत्पादन मोजले जाते. मात्र बऱ्याचवेळी एका संस्थेचे अंतिम उत्पादन दुसऱ्या उत्पादक संस्थेसाठी कच्चामाल असतो. त्यामुळे एकाच उत्पादनाचे दुहेरी मापन होते.

### 2) वस्तु विनिमयाचे व्यवहार :-

विकसनशील देशातील ग्रामीण भागात अजूनही बरेचसे आर्थिक व्यावहार रोखपैशा ऐवजी वस्तुच्या स्वरूपात होतात.
उदा. शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांना पैशाऐवजी धान्याच्या स्वरूपात मजुरी दिली जाते. एका वस्तुच्या बदल्यात दुसरी वस्तु दिली जाते. तसेच एकूण शेती उत्पादनापैकी काही उत्पादन घर खर्चासाठी राखून ठेवले जाते. अशा उत्पादनाचे पैशात मापन केले जात नसल्याने उत्पादनाचे खरे मोजमाप होत नाही.

### 3) घसारा मोजणे :-

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा खर्च वजा केल्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न निघते पण भांडवली वस्तुचे इतके प्रकार आहेत की त्यांची झीज म्हणून किती रक्कम बाजूला काढावी हे सांगणे कठीण असते.

### 4) अचुक सांख्यिकीय माहितीचा अभाव :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे अचूक मापन होण्यासाठी देशातील उत्पन्नासंबधीची सांख्यिकीय माहिती पुरेश्या प्रमाणात उपलब्ध असली पाहिजे. परंतु मागासलेल्या व विकसनशील देशात शेती उत्पादन, जंगल उत्पादन, मत्स्य उत्पादन पशु-पालन व किरकोळ व्यवसाय, बांधकामावरील कामगार इ. उत्पन्नासंबधीची अचुक व विश्वासहार्य माहिती उपलब्ध नसते. हीच अडचण सेवाक्षेत्रातही आहे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना अडचण येते.

5) निरक्षरतेचे मोठे प्रमाण :-

विकसनशील देशात निरक्षर लोकांचे प्रमाण अधिक असते. अशा निरक्षर लोकांकडून उत्पादन, उपभोग व विक्री संबधीची माहिती ठेवली जात नाही. केवळ उत्पादन व उत्पन्नाचे अंदाज बांधुन राष्ट्रीय उत्पन्न मोजले जात असल्याने ते अचुक मिळत नाही

6) आकडेवारी गोळा करण्यातील अडचणी :-

काही वेळेस आकडेवारी मिळते. पण ती गोळा करणे शक्य होत नाही. लोकांकडे उत्पादनाच्या नोंदी नसतात तसेच कर चुकविण्यासाठी खोटे उत्पन्न दाखविले जाते. तसेच माहिती गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे काही पुर्वग्रह असतात. किंवा ते कार्यक्षम जाणकार नसतात.

या प्रकारच्या व्यावहारीक अडचणी होते.

2011 8M * उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :-

मनुष्य हा सर्वच वस्तु स्वत: उत्पादीत करीत नसतो. काही वस्तु त्याला दुसऱ्याकडुन घ्याव्या लागतात. ज्यावेळी अशी स्थीती निर्माण होते. तेव्हा विनिमय प्रकार सुरू होतो.

अर्थव्यवस्थेत पैसा, वस्तु व सेवांचा प्रवाह सतत चालत असतो. हा प्रवाह कुटुंब संस्था, उद्योग संस्था, शासन व विदेशी व्यापारात चालतो. म्हणून या सर्व घटकांना उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात महत्त्व आहे. त्या दृष्टीने या संकल्पनेचा आढावा घेवू.

* व्याख्या :-

"जेव्हा कुटुंब संस्था, उद्योगसंस्था, शासन व विदेशी व्यापार यांच्यात पैसा, वस्तु व सेवा यांचा सतत आर्थिक व्यवहार चालू असतो. त्याला उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात."

या प्रकारे उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाची व्याख्या केली जाते. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात येणाऱ्या घटकांचा सविस्तर आढावा पुढील प्रमाणे घेवू.

2013 प्र.क्र.

* कुटुंब संस्था व उदयोग संस्था यांच्यातील चक्राकार प्रवाह


OR

* दोन क्षेत्रिय प्रतिमाने :-

कटुंब संस्था व उदयोग संस्था यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे दोन क्षेत्रिय प्रतिमाने होय. आधुनिक अर्थव्यवस्थेत उदयोग संस्था वस्तु व सेवांचे उत्पादन करण्याचा प्रयत्न करते. परंतु त्यासाठी आवश्यक असणारे उत्पादनाचे घटक त्यांना कुटुंब संस्थेकडून घ्यावे लागतात कारण कुटुंब संस्था ही उत्पादनाचे घटक ( भुमी, श्रम, भांडवल व संयोजक ) पुरविणारी एकमेव संस्था असते. जेव्हा उदयोग संस्था कुटुंब संस्थेकडून उत्पादनाचे घटक खरेदी करतात व त्या घटकाच्या मोबदला म्हणून अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा देतात व त्या उत्पादक घटकांच्या आधारे वस्तु व सेवांची निर्मिती करतात. जेव्हा या प्रकारचा बाजार पुर्ण होतो तेव्हा त्यास कुटुंब संस्था व उदयोग संस्था यांच्यातील घटक बाजार म्हणतात.

उदयोग संस्था उत्पादक घटकांच्या मोबदला म्हणून कुटुंबाना उत्पन्नाच्या रुपाने पैसा देतात. तेव्हा कुटुंब संस्था त्या उत्पन्नाच्या आधारे आपल्या आवश्यक गरजा पुर्ण करतात. उदयोगसंस्थने बाजारात ज्या वस्तु आणि सेवा विक्रीसाठी आणलेले असतात त्या कुटुंब संस्थेकडून खरेदी केल्या जातात. जेव्हा हा व्यवहार पुर्ण होतो तेव्हा ह्या व्यावहाराला / बाजाराला वस्तू विनिमय बाजार असे म्हणतात.

उदयोग संस्था प्रत्यक्षपणे कुटुंबाकडून उत्पादनाचे घटक खरेदी करत नाही. ते घटक बाजारातून खरेदी केले जातात. म्हणून घटक बाजार निर्माण होतात. कुटुंब संस्था उदयोग संस्थेकडून प्रत्यक्ष वस्तु व सेवांची खरेदी करत नाही तर वस्तु बाजारातून खरेदी करतात. यातुन वस्तुचा बाजार उदयास येतो. कुटुंब संस्था व उदयोगसंस्थांच्या दोन्ही बाजारातुन जेव्हा आपला आर्थिक व्यवहार पुर्ण करतात तेव्हा त्यास दोन क्षेत्रिय प्रतिमाने असे म्हणतात. या दोन क्षेत्रिय प्रतिमानाचे स्पष्टीकरण पुढील आकृतीने दाखविता येते.




वरील आकृती दोन क्षेत्रीय परिमानांची आहे. आकृतीत सर्वप्रथम कुटुंब संस्थेकडुन उद्योग संस्थेला उत्पादनांचे घटक, (भुमी, श्रम, भांडवल व संयोजक) घटक बाजारामार्फत पुरविले जातात असे दिसते. तर त्याबदल्यात कुटुंब संस्थेला उद्योग संस्थेकडुन उत्पादक घटकांचा मोबदला म्हणून अनुक्रमे खंड, वेतन व्याज व नफा दिला जातो असे दिसते.

तर वस्तु बाजारात उद्योग संस्था उत्पादक घटकांच्या साहाय्याने वस्तु व सेवांची निर्मिती करतात व बाजारात विक्रीस आणतात. आणि कुटुंब संस्था आपल्याला मिळालेल्या उत्पादक घटकांचे उत्पन्न हे वस्तु व सेवांवर खर्च करतात. असे या आकृतीतून स्पष्ट होते. जेव्हा कुटुंब संस्थेकडुन उद्योग संस्थेकडे व उद्योग संस्थेकडुन पुन्हा कुटुंब संस्थेकडे एक चक्र पूर्ण होते. तेव्हा त्यांस कुटुंब संस्था व उद्योग संस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात. ही दोन क्षेत्रीय प्रतिमाने पुढील गृहीतांवर आधारलेली आहे.

* गृहिते :-

① अर्थव्यवस्था ही बंदिस्त आहे.
② व्यवसाय क्षेत्रांमध्येच फक्त उत्पादन होत असते
③ दोन क्षेत्रिय प्रतिमानात वस्तुचा साठा राहत नाही.
④ कुटुंब संस्था अथवा उपभोक्ते हे आपल्याला मिळालेले सर्वच उत्पन्न उपभोगांवर खर्च करतात. म्हणजेच बचत करत नाही
⑤ शासनांचे कर व खर्च स्वरूपांचे व्यवहार अजिबात नाही.
⑥ वस्तू व सेवेची आयात निर्यात केली जात नाही इ.

वरील प्रकारची गृहिते ही कुटुंब संस्था व उद्योग संस्था यांच्या उत्पन्नांच्या चक्राकार प्रवाहासाठीच आहेत.

समजा कुटुंब संस्थांनी आपल्याला मिळालेल्या उत्पन्नातून बचत करण्याचे ठरविले तर उत्पन्नांच्या या प्रवाहात घट होते. त्यामुळे उद्योग संस्थेला कमी उत्पन्न मिळते. वस्तूचे साठे पडून राहतात. यांचा परिणाम उत्पादनांच्या दुसऱ्या फेरीत कमी उत्पादन घेतले जाते. पण हीच बचत वित्तीय बजारांच्या माध्यमांतून गुंतवणूकीत रूपांतरीत झाल्यांस उत्पन्नांच्या प्रवाहात पुन्हा भर पडत असते.

ज्याप्रमाणे कुटुंब संस्था बचत करतात. त्याचप्रमाणे उद्योग संस्था आपल्याला मिळालेल्या अवितरीत नफ्यांतून बचत करीत असतात. जर ही बचत उद्योग संस्थेने उत्पन्नांच्या प्रवाहात आणली नाही तर उत्पन्नांचा प्रवाह क्षीण होऊ शकतो. पण वित्तीय बाजारांच्या माध्यमांतून हीच बचत गुंतवणूकीत रूपांतरीत झाली तर उत्पन्नांच्या चक्राकार प्रवाह वेगाने वाहू लागतो.

ज्याप्रमाणे दोन क्षेत्रीय प्रतिमानमध्ये स्पष्टीकरण देता येते त्याचप्रमाणे तीन क्षेत्रीय प्रतिमाने व चतुर क्षेत्रीय प्रतिमानांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येते.

//

## राष्ट्रीय उत्पन्न गणनेचे महत्त्व :
## (Importance of National Income Measurement)

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना केली जाते. या गणनेतून राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची जी आकडेवारी मिळते ती अनेक दृष्टीने उपयोगी पडते. अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची या आकडेवारीवरून कल्पना येतेच; परंतु त्याचबरोबर विविध आर्थिक धोरणे आखण्याच्या बाबतीत राष्ट्रीय उत्पन्नाची मदत होते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची माहिती :**

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वर्षातील अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे मोजमाप केले जाते. वस्तू व सेवांचे मूल्य पैशात व्यक्त करून अशी गणना केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेमुळे विशिष्ट कालखंडातील अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची कल्पना येते.

२) **विविध क्षेत्राची प्रगती समजते :**

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक व दळणवळण अशा विविध क्षेत्रातील वस्तू व सेवांच्या उत्पादनाची गणना केली जाते. या गणनेवरून या विविध क्षेत्राच्या प्रगतीची कल्पना येते, तसेच अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे तुलनात्मक महत्त्व समजण्यासही मदत होते.

३) **अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराची माहिती :**

राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीच्या आकडेवारीवरून देशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धी दरासंबंधी माहिती मिळते. राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर हा अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर स्पष्ट करतो. या दृष्टीने विचार करता अर्थव्यवस्थेची आर्थिक वृद्धीची कल्पना येण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी महत्त्वाची ठरते.

४) **समाजाचे आर्थिक कल्याण समजण्यास मदत :**

देशाचे आर्थिक कल्याण हे राष्ट्रीय उत्पन्नाशी निगडित आहे. इतर परिस्थिती कायम असताना राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही अर्थव्यवस्थेतील आर्थिक कल्याणातील वाढ स्पष्ट करते. साहजिकच राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीमुळे समाजाच्या आर्थिक कल्याणाची व त्यात होणाऱ्या बदलाची माहिती मिळण्यास मदत होते.

५) **आर्थिक विषमतेसंबंधी माहिती :**

राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी ही देशातील राष्ट्रीय उत्पन्न लोकसंख्येच्या विविध गटांत कसे विभागले गेले आहे हेही दर्शविते. यातून राष्ट्रीय उत्पन्नातील विविध गटांचा वाटा समजतो. अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता कमी होत आहे की वाढत आहे, याची या आकडेवारीवरून कल्पना येते. राष्ट्रीय उत्पन्नातील श्रमिकांचा (किंवा वेतनाचा) वाटा वाढल्यास आर्थिक विषमता कमी झाल्याचे स्पष्ट होते.

६) **उपभोग, बचत व गुंतवणुकीसंबंधी माहिती :**

राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी उपभोग, बचत व गुंतवणुकीच्या परिमाणावर प्रकाश टाकते. उपभोगाची पातळी ही समाजातील आर्थिक कल्याणाची पातळी स्पष्ट करते, तर बचत व गुंतवणुकीची पातळी ही देशाची आर्थिक वृद्धी स्पष्ट करते.

**७) आर्थिक धोरणाच्या निश्चितीसाठी उपयुक्त :**

सरकारला आर्थिक धोरणाची आखणी करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी आवश्यक ठरते. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व त्याची विभागणी यासंबंधी अचूक व विश्वसनीय आकडेवारीच्या उपलब्ध असल्याशिवाय सरकार योग्य, वास्तववादी व समतोल आर्थिक धोरणाची आखणी करू शकत नाही.

**८) आर्थिक योजनांच्या आखणीसाठी आवश्यक :**

आज जगातील बहुतेक सर्व देशांनी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारलेला आहे. राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उपभोग, राष्ट्रीय बचत व राष्ट्रीय गुंतवणूक यासंबंधी अचूक आकडेवारी उपलब्ध असल्याशिवाय आर्थिक योजनांची आखणी करणे शक्य होत नाही.

**९) विविध देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना शक्य :**

जगातील विविध राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीची, त्या देशातील राहणीमानाची व आर्थिक कल्याणाची तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची मदत होते. राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करून विविध देशांतील राहणीमान व आर्थिक कल्याणाची तुलनात्मक स्थिती समजते.

**१०) संशोधकांना उपयुक्त :**

राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची आकडेवारी संशोधकांना व विशेषत: अर्थशास्त्रातील संशोधकांना उपयुक्त ठरते. राष्ट्रीय उत्पन्नाशी संबंधित अशा वेगवेगळ्या अभ्यासात राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीचा उपयोग होतो. उदा. आर्थिक कल्याण, आर्थिक विषमता, आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण वगैरेसंबंधी अभ्यास करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीचा उपयोग होऊ शकतो.

**११) मागणी पुरवठ्यासंबंधी अंदाज करण्यासाठी उपयोग :**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे वस्तू व सेवांच्या एकूण पुरवठ्याचा अंदाज करता येतो. उत्पन्नाच्या पातळीवर मागणी अवलंबून असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या आधारे मागणीसंबंधी अंदाज करता येतो.

अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी विविध दृष्टीने सरकार, अर्थशास्त्राचे अभ्यासक व इतर अनेक घटकांना उपयोगी पडते, त्यामुळेच निरनिराळ्या देशांत राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते.

## 2.2.4 दरडोई उत्पन्न (Per Capita Income)

**अर्थ**

दरडोई उत्पन्न ही संकल्पना राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. राष्ट्रीय उत्पन्नावरून देशाच्या अर्थकारणाची स्थिती समजते. सर्वसामान्य व्यक्ती कसे जीवन जगतो हे समजत नाही. दरडोई उत्पन्नावरून देशातील प्रत्येक व्यक्तीचा राष्ट्रीय उत्पन्नात किती वाटा आहे हे समजते. दरडोई उत्पन्नावरून देशाचे सरासरी उत्पन्न आणि लोकांच्या राहणीमानाच्या पातळीची कल्पना येते. देशाच्या आर्थिक विकासाची कल्पना त्या देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नावरून येते.

**व्याख्या**

- ''एका विशिष्ट वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकड्याला त्याच वर्षाच्या लोकसंख्येच्या आकड्याने भागल्यास येणारे उत्पन्न म्हणजे 'दरडोई उत्पन्न' होय.''
- ''एका विशिष्ट कालखंडात प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला येणारे सरासरी उत्पन्न म्हणजे 'दरडोई उत्पन्न' होय.''

**सूत्र :**

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{लोकसंख्या}}$$

जनतेच्या कल्याणाच्या व राहणीमानाच्या पातळीचे मापन करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा दरडोई उत्पन्न हा निर्देशक जास्त योग्य आहे. राष्ट्रीय उत्पन्न फक्त राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सर्वसाधारण वाटचाल किंवा प्रगती दर्शविते. जर राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीएवढी देशाची लोकसंख्या वाढल्यास दरडोई उत्पन्न स्थिर राहील आणि लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत सुधारणा होणार नाही. जर लोकसंख्येत होणाऱ्या वृद्धिदराच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धिदरात वाढ झाली तरच दरडोई उत्पन्न वाढून लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत वाढ होईल.